जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 APR 2018
सकाळ

# कुलगुरू डॉ. शिंदे यांचा आज बहुमान

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना राष्ट्रीय छात्रसेना अर्थात एन.सी.सी.मध्ये 'कर्नल कमांडंट' या मानद कर्नलपदाचा बहुमान उद्या (ता. २६) प्रदान करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या प्रांगणात सकाळी १० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

26 APR 2018
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## संस्कृती - परंपरेचा ठेवा : सातवाहनकालीन इतिहासापासूनचे साक्षीदार

# कोल्हापूरचे सांस्कृतिक वैभव

नसीर अत



**वि. स. खांडेकर स्मृतिसंग्रहालय**

स्थळ : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
वेळ : स. १०.३० ते सायं. ५
सुटी : रविवार आणि शासकीय
तिकीट दर : १० रुपये

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते व ज्येष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांचे शिवाजी विद्यापीठाशी घनिष्ठ नाते होते. विद्यापीठाच्या पहिल्या अधिसभेसाठी राज्यपालांनी खांडेकर यांना मानद सभासद म्हणून नियुक्त केले होते. विद्यापीठाने त्यांना डी. लिट. पदवी देऊन सन्मानित केले होते. हे नाते लक्षात घेऊन विद्यापीठाने सन १९९८ मध्ये खांडेकर यांची जन्मशताब्दी साजरी केली. तत्कालीन कुलगुरू डॉ. द. ना. धनागरे यांच्या कार्यकाळात साजऱ्या झालेल्या जन्मशताब्दीनिमित्त स्मृतितिकीट, पुस्तक प्रकाशन, चर्चासत्र असे विविध कार्यक्रम झाले.

**संतोष मिठारी**

त्या काळात भाषा विषय अध्यापनासाठी स्वतंत्र भवन निर्माण करण्याचा निर्णय झाला. त्याला वि. स. खांडेकर यांचे नाव देण्याची अनौपचारिक कल्पना पुढे आली. या भवननिर्मितीस उशीर झाल्याने ते भवन प्रत्यक्षात सन २००२-०३ च्या दरम्यान तयार झाले. ते खांडेकर यांच्या स्मृतीचे रजत वर्ष होते. हे औचित्य लक्षात घेऊन विद्यापीठाने वि. स. खांडेकर भाषाभवन सुरु केले. तेथे खांडेकर स्मृतिसंग्रहालय सुरू करण्याची कल्पना आली. हा तत्कालीन कुलगुरु डॉ. एम. जी. ताकवले यांचा कार्यकाळ होता. त्यांच्या काळात या प्रकल्पास मान्यता मिळाली. त्यांनी अचानक कुलगुरुपदाचा राजीनामा दिल्याने त्यांच्या निरोपादिवशी संग्रहालयाच्या आवश्यक साधनसंग्रहाची सुरुवात केली. त्यावेळी खांडेकर कुटुंबीयांनी पद्मविभूषण पदवी, पदक, 'अश्रू' कादंबरीचे हस्तलिखित विद्यापीठाकडे सुपूर्द केले. यानंतर डॉ. माणिकराव साळुंखे यांची कुलगुरुपदी नियुक्ती झाली. त्यांना सदर प्रकल्पासाठी आर्थिक तरतूद करून गती दिली. त्यांच्या कार्यकाळात वि. स. खांडेकर संग्रहालय पूर्ण झाले. सन २००५ मध्ये त्याचे विधिवत उद्घाटन झाले. संग्रहालय सुरु करण्यात आले, तेव्हा प्रतिकृती तयार करून त्याचा प्रारंभ करण्यात आला. यानंतर खांडेकर कुटुंबीयांनी मूळ पुरस्कार, वापरातील वस्तू, मानपत्र, आदी सर्व विद्यापीठाला भेट दिले. खांडेकर यांच्या मूळ वस्तू, कागदपत्रे, छायाचित्रे, फिल्म, साहित्य, मुखपृष्ठे, अनुवादग्रंथ, विशेषांक, चित्रपट, ध्वनिफीत, आदींनी युक्त आणि संपन्न असे शास्त्रोक्त संग्रहालय बनले. हे साहित्यिकाचे भारतातील एकमेव संग्रहालय आहे. देशातील सर्वश्रेष्ठ साहित्य-संग्रहालय म्हणून या संग्रहालयाकडे पाहिले जाते. या संग्रहालयाचे आर्किटेक्ट म्हणून विजय गजबर यांनी, शिल्पकार म्हणून संजीव संकपाळ, अतुल डाके, प्रभाकर डोंगरसाने यांनी काम केले. संग्रहालयतज्ज्ञ प. ना. पोतदार होते. छायाचित्र विकास हरिष गडकरी यांनी, तर बाळासाहेब निचिते यांनी प्रशासकीय सहाय्य केले. साधनसंग्रह, मांडणी आणि उभारणीचे डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी पाहिले. त्यांनी सन २००२-२०१२ पर्यंत समन्वयक म्हणून काम पाहिले. सध्या या संग्रहालयाचे संचालक म्हणून प्रा. निलांबरी जगताप, तर अभिरक्षक म्हणून उदयसिंह राजेयादव काम पाहत आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालये, शाळा या संग्रहालयाला भेट देतात.


### साहित्य वाचनाचे संस्कार द्यावेत

वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय हे लेखकाची सर्व साधने एकाच छताखाली उपलब्ध झालेले एकमेव संग्रहालय आहे. येथे चित्रपट पाहण्याची, भाषणे ऐकण्याची सोय आहे. याद्वारे लेखकाची लेखनप्रक्रिया समकालीन साहित्यिकांची छायाचित्रे, चित्रपटांची छायाचित्रे, लेखकाची खोली, आदी पाहत त्या काळात जात येते, असे या संग्रहालयाचे संकल्पक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी सांगितले. ते म्हणाले, काळ जिवंत करणारे संग्रहालय म्हणून ते ओळखले जाते. शाळा, महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना हे संग्रहालय दाखवून साहित्यवाचनाचे संस्कार द्यावेत.

वि. स. खांडेकर यांनी मराठी भाषा, साहित्यास राष्ट्रीय मान्यता मिळवून दिली. त्यांच्या जीवन, कार्याचे दर्शन घडविणारे वस्तुसंग्रहालय विद्यापीठाने 'वि. स. खांडेकर भाषाभवन'मध्ये उभारले. भारतातील लेखकाचे शास्त्रोक्त पद्धतीने निर्माण केलेले हे पहिले संग्रहालय आहे. या संग्रहालयाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जातात. खांडेकर यांच्या वैयक्तिक ग्रंथालयातील दोन हजार पुस्तके संग्रहालयाकडे उपलब्ध आहेत. या पुस्तकांचे स्वतंत्र ग्रंथालय उभारण्याचा मानस आहे.

-प्रा. निलांबरी जगताप, संचालक
वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 APR 2018
तरूण भारत



कोल्हापूर : शाहू कॉलेजमध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जयंतीनिमित्त मार्गदर्शन करताना डॉ. एन. डी. पाटील. सोबत प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. सी. जे. खिलारे आदी.

# महर्षी शिंदे यांनी अस्पृश्यांसाठी आयुष्य वेचले : डॉ. एन. डी. पाटील

प्रतिनिधी
कोल्हापूर

समाजसुधारक आणि कृतीशील विचारवंत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी समर्पित आणि मिशनरी वृत्तीने आपले आयुष्य अस्पृश्यांच्या उद्धारासाठी खर्ची घातले, असे प्रतिपादन ज्येष्ठ नेते डॉ. एन. डी. पाटील यांनी केले. प्रा. एन. डी. पाटील प्रतिष्ठान व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शाहू कॉलेजमध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

डॉ. पाटील म्हणाले, महर्षी शिंदे यांचे समाजसुधारणेमध्ये अतुलनीय योगदान आहे. जातीधर्माची दरी दूर करून सामाजिक समता निर्माण करण्यासाठी शिंदे यांचे विचार अंमलात आणले पाहिजेत. त्यांच्या विचारांचा वारसा पुढच्या पिढीने जपला पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले. 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या अस्पृश्योध्दाराच्या कार्याची प्रस्तुता" या विषयावर बोलताना डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, भारतीय पातळीवरील दलित समाजसुधारणेच्या इतिहासात शिंदे यांच्या कार्यचे वेगळेपण आहे.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील तर आभार प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे यांनी मानले. यावेळी डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. अरूण भोसले, डॉ. राजन गवस, कॉ. अतुल दिघे, दशरथ पारेकर, दलितमित्र व्यंकाप्पा भोसले, प्राचार्य सी. ए. कांबळे, डॉ. नंदकुमार मोरे, कॉ. दिलीप पवार, प्राचार्य य. ना. कदम, प्राचार्य दिनकर खाबडे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 APR 2018
Times of Ind

# SUK changes date for environmental studies paper by one week

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has moved the schedule of environmental studies paper by a week from May 13 to May 20. According to university officials, the schedule has been changed due to the Maharashtra Public Service Commission (MPSC) exam on May 13.


A notification on April 23 from Mahesh Kakade, director, board of examinations and evaluation, SUK said that the change in the schedule is for around 23 courses of BSc, BCA, BA, B Tech, BCS, B Textile and B voc.

A university official from the exam department said that more than 20,000 students will be affected with this change and they will have to make note of the new date on their calenders.

The official added that rescheduling was the safest option as the availability of centres and supervisors will be a concern due to the MPSC exam. "We have already notified the colleges regarding the change to avoid any kind of confusion among students regarding the exam day and date. The rescheduled exam will commence on the original time that was announced earlier," said the official.

When **TOI** tried to contact Mahesh Kakade, director, board of examinations and evaluation, he was not available for comments.

It has to be noted that the SUK has 283 affiliated colleges across Sangli, Satara and Kolhapur districts, with over 2.5 lakh students imparting education in over 30 courses. The summer semester examinations this year started from March 22 across all the three districts.



## Some courses affected by change

BSc, BSc (Biotech), BSc (Sugar), BSc (IT), BSc (Animation), BSc (Forensic Science), BSc (Food processing), BCA, BBA, Law, B Tech, BSc (Nano-science technology), BVoc, BMM, B Textile, BCS, B Pharm

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 APR 2018
महाराष्ट्र टाईम्स

# पर्यावरण परीक्षा लांबली

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे घेण्यात येणारी पर्यावरण अभ्यास विषयाचा पेपर २० मे रोजी होणार आहे. पूर्वनियोजनानुसार हा पेपर १३ मे रोजी होणार होता. परीक्षा व मूल्यमापन संचालक महेश काकडे यांनी ही माहिती दिली. बी. एस्सी. मधील बायोटेक, शुगर टेक्नॉलॉजी, आय. टी., ॲनिमेशन, फॅरेन्सीक सायन्स, फूड प्रोसेसिंग, नॅनो सायन्स टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमातील पर्यावरण अभ्यास याचा समावेश आहे. तसेच बीसीए, बीबीए, बी टेक, लॉ, बी आयडी, बीएफटीएम, बीडेस, बीडीएफसी, बीसीएस, बी फॉर्म, एस. ई., बी. आर्किटेक्चर, बी. टेक्सटाइल, बीएमएम व बी व्होकच्या विद्यार्थ्यांनाही परीक्षा २० मे रोजी द्यावी लागेल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 APR 2018
लोकमत




# साहित्य भान

प्रा. रणधीर शिंदे

# स्मरण विंदांचे

विंदा करंदीकरांचे २०१८ हे जन्मशताब्दी वर्ष. विंदांच्या जीवनकार्यात कोल्हापूर शहरास असाधारण असे महत्त्व आहे. कोल्हापूरविषयी त्यांच्या मनात सातत्याने कृतज्ञतेची भावना होती. कोल्हापुरातील शालेय व महाविद्यालयीन शिक्षण हा त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा. पुढील आयुष्याची पायाभरणी करणारा हा काळ होता. कोकणातील गरिबीची परिस्थिती, सावत्र आई. बालपणी एकदा ते आंब्याच्या झाडावरुन पडले तसेच विहिरीतही कोसळले. प्राथमिक शिक्षण थांबले. कोल्हापूरचे विठू काका रानडे हे आचारी व्यवसाय करणारे एक स्नेही त्यांच्याकडे होते. त्यांच्याबरोबर प्राथमिक शिक्षणासाठी ते कोल्हापुरात आले. सातही दिवस वार लावून त्यांनी शिक्षण घेतले. साठे मास्तरांकडे राहण्याची सोय केली केली होती. न्यू स्कूलमध्ये त्यांचे शिक्षण झाले. हे त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचे स्थित्यंतर. कोल्हापूरमुळेच 'एक शेतकरी भिक्षुक होण्याऐवजी इंग्रजीचा प्राध्यापक बनलो, असे त्यांनी म्हटले आहे.



करंदीकरांचा लेखनारंभ शाळेतच झाला. शाळेत 'वसंतविकास' या नावाने कविता लिहिल्या. 'नौका' ही त्यांची पहिली कविता हायस्कूलच्या त्रैमासिकात प्रसिद्ध झाली. शाळेत कवी नागेश हे संस्कृतचे शिक्षक त्यांना लाभले. हायस्कूलला देवधर नावाच्या बालमित्रामुळे वाङ्मय वाचनाचा छंद जडला. 'विशाखा'तील कविता वाचून ते भारावून गेले. मुकटा नेसून वार लावलेल्या घरी ते जेवायला जात.

कोल्हापुरातील वास्तव्याच्या काळात शिक्षकांच्या शिकवणुकीचा त्यांच्यावर मोठा प्रभाव आणि परिणाम झाला. ना. सी. फडके, माधव ज्युलियन, वाय. जी. नाईक या शिक्षकांचा त्यांच्यावर फार प्रभाव पडला. राजाराममधून इंग्रजी विषयातून पदवी प्राप्त केली. राजाराम महाविद्यालयातील इंग्रजीचे प्रा. यशवंत गणेश नाईक यांच्या शिकवण्याचा मोठा प्रभाव त्यांच्यावर होता. करंदीकरांनी त्यांचा 'परंपरा आणि नवता' हा समिक्षाग्रंथ कृतज्ञताभावाने त्यांना अर्पण केला. 'ज्ञानवेडा माणूस' असा करंदीकरांनी त्यांचा उल्लेख केला आहे. राजाराम महाविद्यालयातील पर्शियनचे प्राध्यापक आणि त्यांना इंग्रजी शिकविणारे कवी माधव ज्युलियन यांचा करंदीकरांवर विलक्षण परिणाम झाला.

बाळासाहेब खर्डेकर हे त्यांचे गुरु. बाळासाहेब खर्डेकरांनाही त्यांनी एक ग्रंथ अर्पण केला आहे. त्यांच्या आग्रहामुळे विंदा व त्यांच्या पत्नी कागलला खर्डेकरांनी सुरु केलेल्या कॉलेजात रुजू झाले. कागलजवळील तळ्याकाठी गावाबाहेर गोखले कॉलेज होते. करंदीकरांच्या घरात त्यावेळी वडिलांसह नात्यातील अनेक मुलं होती. रणजित देसाई, आनंद यादव तेथील शाळेत विद्यार्थी होते. एकदा विंदा सपत्नीक रणजित देसाईबरोबर तमाशा पाहायलाही गेले होते. त्यावेळी कागलला वीज नव्हती. एम. आर. देसाई हे प्राचार्य होते. त्यांच्याशी विंदांचा विशेष स्नेह होता. १९५० च्या पहिल्या निवडणुकीत खर्डेकर व एम. आर. देसाईंचा प्रचारही विंदा व त्यांच्या पत्नीने खेडोपाडीही केला.

करंदीकरांच्या 'स्वेदगंगा' संग्रहातील बऱ्याच कविता करवीर नगरीत विंदांनी लिहिल्या. 'सरोज नवानगरवाली'सारखी कविता, राष्ट्रीय जाणीवेची कविता, बालकविता, तसेच 'रक्तातुनिया रक्त मिसळले जीवन पुढती न्याया'सारखी 'रक्तसमाधी'सारखी उत्कट प्रीतभावनेचाअत्यंत धीट आविष्कार करणारी कविता विंदांनी कोल्हापुरातच लिहिली. तर कागलमधे 'ती जनता अमर आहे'सारखी गाजलेली कविता लिहिली. मराठीतील या प्रतिभावंत साहित्यिकाच्या घडणीमागे कोल्हापूरच्या भू-समाजजीवनाचा महत्त्वाचा संदर्भ आहे, त्याचे स्मरण.

(लेखक शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्राध्यापक आहेत)
kollokmatpratisad@gmail.com